INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील योगदान

**(Contribution of Educational Institutions of Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad) District to the Education Sector of Maharashtra)**

**जगदीश भिकनराव सूर्यवंशी**
प्राचार्य,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सायगव्हाण,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/12.2024-85795844/IRJHIS2412007

**प्रस्तावना :**

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेत अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जिल्ह्याला प्राचीन ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक वारसा लाभला आहे. परंपरागत शिक्षणापासून आधुनिक शिक्षणापर्यंत, शिक्षण क्षेत्रात या जिल्ह्याने केलेली प्रगतीउल्लेखनीय आहे.

**प्राचीन आणि मध्ययुगीन शिक्षणाचा वारसा :**

मराठवाड्यातील शिक्षणाची परंपरा फार प्राचीन असून, नालंदा आणि तक्षशिला यांसारख्या विद्यापीठांप्रमाणेच मराठवड्यातही पैठण आणि वेरुळ, अजिंठा यांसारख्या ठिकाणी शिक्षणाचे केंद्र होते. येथे धार्मिक ग्रंथांचे अध्ययन, ज्योतिष, तत्त्वज्ञान आणि साहित्य यांचा अभ्यास केला जाई. जिल्हा प्राचीन काळापासून शिक्षणाचे केंद्र राहिले आहे. बौद्ध काळातील अजिंठा-वेरूळ लेण्यांमध्ये असलेले शैक्षणिक चिन्ह आणि यातील वास्तुशिल्पीय कला शिक्षणाच्या उच्च दर्जाची आणि शैक्षणीक समृद्धीची ग्वाही देतांना दिसून येतातया लेण्यांमधून तत्कालीन तत्त्वज्ञान, धर्म आणि संस्कृती शिकवण्याची परंपरा दिसून येते. मध्ययुगीन काळात मुघल शासनामध्ये तसेच निझामकाळात औरंगाबाद शहराला महत्त्व प्राप्त झाले, जिथे इस्लामिक शिक्षण आणि कला-विज्ञान, शिल्पकला,वास्तुकला, व्यवसाय आणि कुशल मनुष्यबळ यांना प्रोत्साहन देण्यात आलेले दिसून येते पेशवाईच्या काळात शैक्षणिक पद्धतींवर अधिक भर देण्यात आला, ज्यात संस्कृत, वेद आणि गणित यांचा समावेश होता.

**ब्रिटिश काळातील शिक्षणाचा विकास :**

ब्रिटिश साम्राज्याच्या काळात जिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार झाला. प्राथमिक शाळांपासून उच्च माध्यमिकशिक्षणापर्यंतच्या सुविधा विकसित करण्यात आल्या. ब्रिटिश काळातील शाळांमध्ये मराठी, उर्दू, आणि इंग्रजी भाषा शिकवण्यावर भर दिला गेला, ज्यामुळे जिल्ह्यात

शिक्षणाचा पाया अधिक मजबूत झाला. स्वातंत्र्योत्तर काळातील प्रगती स्वातंत्र्यानंतर छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद जिल्ह्यात शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात स्थापन झाल्या. जिल्ह्याने केवळ स्थानिक शिक्षणच नाही तर राष्ट्रीय स्तरावरील संशोधन, तंत्रज्ञान आणि विज्ञान शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिसून येते

**उच्च शिक्षणातील योगदान :**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनेक शिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत जिल्ह्यात विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, आणि व्यवस्थापन क्षेत्रातील शिक्षण संस्था उभ्या राहिल्या आहेत. या संस्थांनी अनेक क्षेत्रांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे विद्यार्थी घडवले आहेत.तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात जिल्ह्याने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. जिल्ह्यातील विविध शैक्षणीकसंस्था विद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तांत्रिक संस्था, आणि औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे (ITIs) विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी सदैव कार्य करत असतात यामुळे जिल्ह्यातील युवकांनाऔद्योगिक आणि तांत्रिक क्षेत्रात रोजगाराच्या संधीउपलब्ध होतात. कला, साहित्य आणि संस्कृती शिक्षणछत्रपती संभाजीनगर हे केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षणापुरते मर्यादित नाही तर साहित्य, कला आणि संस्कृती शिक्षणालाही प्रोत्साहन देते. येथील संस्थांमधून इतिहास, पुरातत्त्वशास्त्र आणि संस्कृतीयांचे शिक्षण दिले जाते.

**ग्रामीण शिक्षणाला चालना :**

जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिक्षण पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले आहेत. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा आणि आश्रमशाळा सुरू केल्या गेल्या. सरकारी योजना आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण शिक्षणात लक्षणीय प्रगती झाली आहे. स्त्रियांसाठी जिल्ह्यातील शिक्षण संस्थांनी मोठे योगदान दिले आहे जिल्ह्यातील महिलांसाठी विशेष शाळा आणि महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. यामुळे मुलींच्या शिक्षणाचा दर वाढला असूनसमाजात शिक्षित महिलांची संख्या वाढत आहेपर्यायाने स्त्री शिक्षणाचा विकास होत आहे.

**आंतरराष्ट्रीय शिक्षणाची ओळख :**

जिल्ह्यातील काही शिक्षण संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या आहेत. येथे जागतिक दर्जाच्या अभ्यासक्रमांचा समावेश केला गेला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक संधी उपलब्ध होत आहेत

**संशोधन क्षेत्रातील प्रगती :**

जिल्ह्यातील उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठे विविध क्षेत्रांत संशोधनाला चालना देत आहेत संशोधन केंद्रांमधून शास्त्र, औषधनिर्मिती, कृषी आणि पर्यावरण विषयांवर महत्त्वपूर्ण संशोधन केले जात आहे

**पर्यावरण शिक्षणाचा विकास :**

पर्यावरणीय विषयांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांमुळे जिल्ह्यात पर्यावरण शिक्षणाचा प्रसारझाला आहे वृक्षारोपण कार्यक्रम, सौरऊर्जेचा वापर आणि पर्यावरण संवर्धनाचे धडे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने शैक्षणिक क्षेत्रात केलेले योगदान सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहे. या जिल्ह्याने जागतिक दर्जाचे विद्यार्थी घडवले असून शिक्षणाचा सामाजिक न्याय, समता, आणि प्रगती साधण्यासाठी उपयोग केला आहे. जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था भविष्यातही या योगदानाला पुढे नेण्याचे काम करतील. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शैक्षणिक योगदान हे महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या शैक्षणिक परंपरेचा अभिमान आहे. या जिल्ह्यातील शिक्षण प्रणालीने समाजाला पुढे नेण्यासाठी

आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्य, आणि मूल्ये प्रदान केली आहेत. या प्रयत्नांमुळे जिल्ह्याचे शैक्षणिक क्षेत्र अधिक उंचीवर पोहोचलेआहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यात अनेक विशेष शैक्षणिक संस्था आहेत, ज्यांनी विविध क्षेत्रांतमहत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या संस्थांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय बदल घडवून आणले असून समाजाच्याप्रगतीसाठी मोठे कार्य केलेआहे. येथे अशा काही महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्थांची सखोल माहिती दिली आहे

**१. सरस्वती भुवन शिक्षण संस्था:**

स्थापना आणि इतिहास : १६ मार्च १९१५ रोजी या संस्थेच्या माध्यमातून औरंगाबाद येथे पहिली मुलांची मराठी शाळा सुरु झाली. व्यवस्थापन समितीचे पहिले अध्यक्ष श्री पंडितराव पारगावकर व सरचिटणीस म्हणून श्री राजाराम पोळ होते मराठवाडा हा प्रांत हा निझाम राजवटीत होता. प्रशासन हे उर्दू भाषेतून चालत होते बहुसंख्यांची बोलीभाषा मराठी, मात्र प्रशासन आणि मिळणारे शिक्षण उर्दू भाषेतून उपलब्ध होते. मराठवाड्यातील नागरिकांना आपल्या भाषेतून म्हणजे, मराठी भाषेतून शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली.प्राथमिक शाळेपासून सुरु झालेली संस्था पुढे जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री गोविंदभाई श्राफ यांनी उच्च शिक्षणाचीरज ओळखून कला, विज्ञान, वाणिज्य, संगीत, नाट्यशास्त्र अशा विविध शाखांची दालने खुली करून दिली गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि स्वयंरोजगाराची निर्मिती ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन या संस्थेचे कार्य चालू आहेआजही संस्थेचे अनेक विद्यार्थी देशातील अनेक राज्यात तसेच परदेशातही मोठ्या पदावर आहेत.

**२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (BAMU)**

स्थापना आणि इतिहास: 1958 मध्ये स्थापना झालेली ही विद्यापीठ मराठवाड्यातील उच्च शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहेडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखले जाणारे हे विद्यापीठ प्रामुख्याने मराठवाडा विभागातीलतसेच राज्य आणि देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते.

उच्च शिक्षण: विद्यापीठाने कला, विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, आणि अभियांत्रिकी अशा अनेक क्षेत्रांत पदवी, पदव्युत्तर, आणि संशोधनासाठी अभ्यासक्रम उपलब्ध केले आहेत.विद्यापीठाने विविध संशोधन केंद्रे स्थापन केली आहेत, जसे की पर्यावरणशास्त्र, भाषा संशोधन आणि समाजशास्त्र. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजनांची आखणी आणि अंबलबजावणी विद्यापीठ करत असते.

**३. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ:**

स्थापना आणि इतिहास: मराठवाड्यातील व इतर परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे या उद्देशाने माजी मंत्री श्री विनायकराव पाटील यांनी १ सप्टेंबर १९५८ रोजी मराठवाडा शिक्षण मंडळाची स्थापना केली.आज जवळपास संस्थेच्या १३६ शाळा व ११ महाविद्यालये आहेत. संस्थेचे देवगिरी हे महाविद्यालय औरंगाबादमधील सर्वांत प्रसिद्ध महाविद्यालयांपैकी एक आहे 1960 च्या दशकात स्थापन झालेले हे महाविद्यालय अनेक क्षेत्रांतील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखले जाते संपूर्ण शिक्षण प्रणालीइथे विज्ञान, वाणिज्य, कला, आणि संगणकशास्त्राच्या क्षेत्रांत उच्च शिक्षण दिले जाते

तंत्रज्ञानातील नवकल्पना: नवीन तांत्रिक उपकरणे आणि पद्धतींचा अवलंब तसेच विद्यार्थ्यांचे नेतृत्व विकासासाठीनेतृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी विशेष कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम हे घेतले जातात.

**४. मौलाना आझाद शैक्षणिक संस्था -**

स्थापना आणि इतिहास- 1963 मध्ये स्थापन झालेले हे कॉलेज बहुश्रुत शिक्षणासाठी ओळखले जाते या संस्थेचे योगदान देखील मराठवाडा तसेच खास करून औरंगाबाद जिल्ह्यासाठी महत्वाचे आहे. विद्यार्थी विकास-विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, विज्ञान, आणि वाणिज्य क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम सदर शैक्षणीक संस्थेत राबवले जातात.

संशोधन प्रोत्साहन- महाविद्यालयात विविध शास्त्रीय आणि तांत्रिक प्रकल्प राबवले जातात.

सामाजिक प्रबोधन- शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग दिसून येतो.

**५. मिल्लीया शिक्षण संस्था :**

स्थापना आणि इतिहास: 1972 मध्ये स्थापन झालेली ही संस्था प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण देते समाजातील अल्पसंख्याक समुदायाच्या प्रगतीसाठी ही संस्था प्रामुख्याने ओळखली जाते

विविध अभ्यासक्रम: इथे वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी, आणि व्यवस्थापन क्षेत्रांतील विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.अल्पसंख्याक समुदायाच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विशेष योजना उद्योगाभिमुख अभ्यासक्रमांसाठी विशेष विभाग कार्यरत आहे.

**६. विविध राज्य आणि राष्ट्रीय शैक्षणिक संस्था :**

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी जिल्ह्यातील काही राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील शाळा.जागतिकदर्जाच्या शैक्षणिक मानकांनुसार विद्यार्थी घडवण्याचे उद्दिष्ट या संस्थेचे असून आंतरराष्ट्री तसेच जागतिक स्तरावरील शिक्षण पद्धतींचा समावेश तसेच सर्वसमावेशक शिक्षणाचा आणि विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा पुरविण्यासाठी सदर संस्था तत्परतेने कार्यरत असून स्थानिक भाषांबरोबरच इंग्रजी, हिंदी, आणि उर्दू भाषांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांनादेण्यात येते.

**७. सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालय (GECA)**

1960 मध्ये स्थापना झालेले हा महाराष्ट्रातील अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी एक आहे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी शिक्षण, संशोधन, आणि सामाजिक विकासात मोठे योगदान दिले आहे. या संस्थांनी केवळ स्थानिक पातळीवरच नाही तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपले महत्त्व सिद्ध केले आहे. शिक्षणाच्या या योगदानामुळे जिल्ह्यातील तरुण पिढीला ज्ञान, कौशल्य, आणि मूल्यांची गाठ बांधता येते, जी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरते.

**संदर्भ –**

१) प्रा. तांबोळी शमसुदिन, महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास.

२) चित्ते कीर्ती, शाश्वत विकासासाठी शिक्षण.

३) दळवी रामचंद्र, महाराष्ट्रातील शैक्षणिक विचारवंत व त्यांचे कार्य.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांची विविध शैक्षणिकप्रकाशने.